*Dr. Kirit Somaiya*
***B.Com, FCA, Ph.D.***
*Ex-Member of Parliament*
*Member, BJP National Executive*
*Vice President, BJP Maharashtra*

**Bharatiya Janata Party**
**भारतिय जनता पार्टी**

नोव्हेंबर १२, २००७

# गहू घोटाळा

## आता रु. १८ दराने अधिक आयात

काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारने आपला आयात घोटाळा पुढे चालूच ठेवला आहे. १० लाख टन गहू आयात करण्यासाठी आदेश देण्यात आले आहेत. तो रु. १८ आणि त्याहून अधिक दराने आयात करण्यात येईल. हे दुसरे तिसरे काही नसून, रु. ३००० कोटीच्या गहू आयात घोटाळ्याचा पुढचा अंक आहे, असा आरोप डॉ. किरीट सोमैय्या यानी केला.

असे समजले आहे कि, सरकारने या आधीच एसटीसी ला आणि अन्य एजन्सीजना आयात प्रक्रिया सुरू करण्यास सांगितले आहे. निविदा मागविल्या जात आहेत.

भारत सरकार परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्याना रु. १००० कोटी अधिक देणार आहे. जून २००७ पर्यंत भारत सरकारने भारतीय शेतकऱ्याना चांगल्या प्रतीच्या गव्हाला सरासरी रु. ८ दर दिला आहे. जी बहुराष्ट्रीय कंपनी रु. दराने गहू आयात करणार आहे तिने अधिक चांगल्या प्रतीचा गहू भारतीय शेतकऱ्यांकडून रु. ९ प्रति किलो दराने खरेदी केला आहे. भारत सरकारने १० लाख टन गहू भारतीय शेतकऱ्यांकडून खरेदी केला असता तर, त्यासाठी फक्त रु. ८०० कोटी द्यावे लागले असते. आता तेच सरकार परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्याना १० लाख टन गव्हाच्या खरेदीसाठी रु. १८०० कोटी देणार आहे.

**भाजपने परत एकदा गहू आयात घोटाळ्याच्या सीबीआय चौकशीची मागणी केली आहे.**

***प्रसिद्धी सचिव***

**BJP Office :** ● 11, Ashoka Road, New Delhi 110 001

➔**Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081- Tel21639649/21634152
(M)9869220027 ● Fax : 21637432 - Email: kirit@vsnl.in, neelamnagar@rediffmaill.com
Website : www.kiritsomaiya.com